पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी
क्र फक्षेका/सभा/कावि/996/2018
दिनांक – 27/09/2018

प्रति,

मा.---------------------------------------

सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका

निगडी – 411044

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि. 01/10/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक 01/10/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील **"राजर्षी शाहु महाराज सभागृहात"** आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. तरी आपण सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

आपली विश्वासू,

Radelaz

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरलिका

प्रत – 1. संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख------------------------ विभाग
2. कार्यालयीन नोटिस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018**

**मा. फ प्रभाग समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक – 07**

वेळ. सकाळी 11.30 वाजता

दिनांक:- 01/10/2018

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि. 01/10/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील " राजर्षी शाहु महाराज सभागृहात " आयोजित करणेत आली आहे. सदर सभेस खालील प्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक 03/09/2018 रोजी झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्रमांक 6) कायम करणे.

विषय क्रमांक 1) मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/04/कावि/622/2018 दिनांक 21/09/2018 चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना पुरविण्यात येणा-या सुविधांपैकी आयडेंटिटी कार्ड, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटरपॅड इ. सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक 2) मा. क्षेत्रीय अधिकारी फ प्रभाग यांचे पत्र क्र.फक्षेका/02/कावि/ 324 /2018 दिनांक 18/09/2018 चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील एकुण 1641 फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण झालेले आहे. त्यापैकी बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांची संख्या 877 इतकी आहे. बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांपैकी 781 फेरीवाल्यांना फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे. ज्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे, त्यांना जागा निश्चीत करणे आवश्यक आहे.

याबाबत हॉकर्स झोन पुन:स्थापित करणेसाठी क्षेत्रीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करणेबाबत दि. 27/03/2018 रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेमध्ये मा.आयुक्त यांनी सुचविल्यानुसार हॉकर्स झोन तयार करणेसाठी केंद्र व राज्यशासन यांचे नियम व मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार प्रभाग स्तरावर एक उपसमिती स्थापन करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे –

प्रभाग हॉकर्स झोन फेरीवाला उपसमिती

1. श्री. मनोज लोणकर अध्यक्ष – क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय
2. श्री. श्रीकंत सवणे – सदस्य – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, फ क्षेत्रीय कार्यालय
3. श्री. विनायक माने – सदस्य - उपअभियंता नगररचना विभाग
4. श्री. एन के घोगरे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक, निगडी

कृ. मागे पहा

5. श्री. अरुणकुमार सोनकुसरे – सदस्य अतिक्रमण निरीक्षक,अतिक्रमण विभाग (स्थापत्य)

6. एफ डी ए प्रतिनिधी (food & drug administration) (अन्न सुरक्षा प्रशासन)

7. फेरीवाला संघटनेचे सदस्य

   1. श्री. जेकब मॅथ्यु, पीसीएमसी वसाहत अण्णासाहेब नगर, सुम नं 154, निगडी पुणे 411044
   2. श्री.मधुकर दयाराम वाघ – मोबाईल क्रमांक - 9226882573
   3. श्री.अनिल तुकाराम बारवकर – मोबाईल क्रमांक - 9028500602

सबब उपरोक्त प्रमाणे नियुक्त केलेल्या समितीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

टिप – (मा.अध्यक्ष यांचे आदेशानुसार सर्व शाखाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित उपरोक्त विषयांची सविस्तर माहिती/टिपण तयार करुन मासिक सभेचे वेळी उपस्थित रहावे.)

**विषय क्र 3** मा.सभापती यांचे परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरलिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी 44
क्र.फक्षेका/सभा/कावि/996/2018
दिनांक – 27/09/2018